# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**(सायंकाळ)**

---

**दिनांक ०६.०८.२०२६ गुरूवार**

**नागपुर शहर पोलीस दलाचा 'पोलीस दीदी' उपक्रम :**

मा. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांचे आदेशान्वये नागपूर शहर अंतर्गत परिमंडळनिहाय सर्व पोलीस ठाणे अंतर्गत कार्यरत असलेले पथके तसेच गुन्हेशाखा अंतर्गत दामिनी पथक यांचे मार्फतीने **'पोलीस दीदी'** उपक्रम राबविण्यात येत आहे. उपक्रमाअंतर्गत प्रत्येक पोलीस ठाणे येथे एक अधिकारी व तिन अंमलदार यांची नेमणुक असते. महिला पोलीस अधिकारी व अंमलदार हे शाळा, महाविद्यालये, महिला वसतीगृहे, टयुशन क्लासेस तसेच झोपडपट्टी परिसर येथे जाऊन विद्यार्थीनी व महिला यांना गुड टच व बॅड टच, छेडखानी, लैंगिक अत्याचार, सायबर क्राईम इत्यादींबाबत कायदेविषयक ज्ञान व माहिती समजावून सोशल मिडीयाचा वापर कसा करावा तसेच पोलीस विभागाशी संबंधीत हेल्पलाईन व फोन नंबर याचा वापर करण्याबाबत मार्गदर्शन करुन महिला व बालकां विषयी होणाऱ्या अपराधांना प्रतिबंध करण्याचा प्रयत्न करतात.

पोलीस दीदी या उपक्रमाचा कम्युनिटी पोलीसींग मध्ये समावेश आहे. स्त्रिया व बालकांना समाजात वावरतांना सुरक्षितता वाटावी तसेच हा त्याचा मुलभुत हक्क आहे यावर नागपुर पोलीसांनी नेहमीच भर देऊन त्यांचे संरक्षणाला प्राधान्य दिलेले आहे. संरक्षण पुरविण्यात येणाऱ्या मुली व महिलांमध्ये भरोसा निर्माण करण्याचे नागपूर पोलीसांचे प्रमुख ध्येय आहे. पोलीस दीदींचे लक्ष्य प्रामुख्याने पुर्वकिशोरवयीन व किशोरवयीन गटापर्यंत पोहोचने आहे. सध्या मुलांना स्मार्ट फोनचे व्यसन असून बहुतांश १३ ते १९ वयोगटातील मुली व बालकांचा समावेश असुन मुलींचे घर सोडून जाण्याचे प्रमाण वाढलेले आहे. त्यांनी खोटया आश्वासनांना बळी न पडता, लैंगिक संबंधाकरीता प्रवृत्त न होता, सजग व सावध राहणे आवश्यक असून त्यामुळे त्यांचे भावी आयुष्य सुखमय होण्यास मदत होईल. पोलीस दीदी उपक्रमाअंतर्गत शाळा, महाविद्यालये व मुलांचे पालक यांनीसुदधा पुढाकार घेऊन सजग व सज्ज राहणे आवश्यक आहे. उपक्रमातील काम करणारे अधिकारी व अंमलदार यांचे मार्फतीने नागपूर पोलीस आयुक्तालयाअंतर्गत येणारे शाळेतील विद्यार्थीनींना त्यांचे स्वसंरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण देण्याचा उपक्रम हाती घेतलेला आहे.

**(कामगिरी)**

**१) गिट्टीखदान पोलीसांची कामगीरी :— घरफोडी करणाऱ्या आरोपीस अटक, एकुण ०२ गुन्हे उघडकीस.**

दिनांक ३१.०७.२०२६ चे २१.३० वा. ते दिनांक ०१.०८.२०२६ चे १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे गिट्टीखदान हद्दीत प्लॉट नं. ३, गायकवाड ले आऊट, गायत्री कॉलनी, हजारीपहाड, नागपूर येथे राहणारे फिर्यादी धम्मशील नंदकिशोर शामकुंवर वय ४० वर्षे हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह पुणे येथे नातेवाईकांकडे गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील लोखंडी आलमारीतील रोख ६,५००/— रु व सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने किंमती ३,४८,५००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे

गिट्टीखदान येथे पोउपनि. पठान ९९२३१४०७३४ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला होता.

गुन्ह्याचे तपासादरम्यान गिट्टीखदान पोलीसांचे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून, मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, रामनगर चौक ते भरतनगर रोड बाजीप्रभु मंदीराजवळ आरोपी सागर उर्फ भांजा अशोक वर्मा, वय २२ वर्षे रा. विजय नगर, जुने शितला माता मंदीरजवळ, कळमना, नागपुर यास ताब्यात घेवुन, विचारपुस केली असता, त्याने वर नमुद घरफोडीचा गुन्हा केल्याची कबूली दिली. त्याचेजवळील ॲक्टीवाबाबत विचारपूस केली असता, त्याने दुचाकीचा घरफोडीचे गुन्हयात वापर केल्याचे सांगून नमुद ॲक्टीवा क्र. एमएच २७ एजे ६६७२ ही पोलीस ठाणे पाचपावली हद्दीतुन चोरी केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन घरफोडीचे गुन्ह्यातील सोन्या–चांदीचे वेगवेगळे दागिने किंमती २,३९,६००/—रू. चा मुद्देमाल तसेच पाचपावली येथील वाहन चोरीचे गुन्ह्यातील ॲक्टीवा मोपेड क्र. क्र. एमएच २७ एजे ६६७२ किमती ३०,०००/—रू. असा एकुण २,६९,६००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपीकडून दोन गुन्हे उघडकीस आणलेले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती विनीता शाहु, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. सुनिलसिंग पवार, सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. सारंग मिराशी, सपोनि बालाजी लालपालवाले, पोउपनि. खुशाल राठोड, सफौ. अनिल त्रिपाठी, पोहवा. विनोद बर्डे, महेश जाधव, विशाल नांदेकर, पोअं. राहुल पांडे, सचिन खडसे व अविनाश पांडे यांनी केली.



**<u>२) अंबाझरी पोलीसांची कामगिरी :— अग्निशस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक ०६.०८.२०२६ चे ००.०६ ते ००.५० वा. चे दरम्यान, अंबाझरी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, कल्याणेश्वर मंदीर ते तेलंगखेडी गार्डन परिसर येथे एक खाकी रंगाचा टिशर्ट व निळा फुलपॅन्ट घातलेला इसम अग्निशस्त्रासह फिरत आहे. अशा माहितीवरुन नमुद ठिकाणी गेले असता, मिळालेल्या वर्णनाचा इसम संशयीतरित्या दिसल्याने त्यास ताब्यात घेऊन, पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने त्याचे नाव अतुल सुरेश चव्हाण वय २२ वर्षे, रा. गौतमनगर, भिवसनखोरी, नागपूर असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता, कोणतीही अवैध वस्तु मिळाली नाही. त्यास पोलीस ठाणे येथे आणुन, सखोल विचारपुस केली असता, त्याने पंचासमक्ष गौतमनगर, बुध्दविहार, भिवसनखोरी येथील एमएसईबी डिपी जवळील सिमेंट सिटचे मागुन एक गावठी बनावटीची पिस्टल मॅग्जिनसह पोलीसांना काढून दिली. त्याचे ताब्यातुन एक देशी बनावटीचे अग्निशस्त्र मॅग्जिनसह किंमती ७५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपीविरुध्द पोलीस ठाणे अंबाझरी येथे फिर्यादी पोअं प्रविण लोखंडे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोउपनि. अविनाश खटके यांनी कलम ३,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करुन आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

वरील कामगिरी मा. श्रीमती अन्नपुर्णा सिंग, पोलीस उप आयुक्त (परि. क्र. २), मा. श्री. किरण पोपळघट, सहा. पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. विनोद गोडबोले व तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे वाडी :— हद्दपार ईसमास अटक.</u>**

दिनांक ०६.०८.२०२६ चे ०१.३५ वा. चे सुमारास, वाडी पोलीसांचे तपास पथक हे पोलीस ठाणे हद्दीत गुन्हेगारांचे शोधार्थ गस्त करीत असता, वडधामना परिसर, टिसीआय गोडावूनजवळ एक इसम संशयीररित्या फिरतांना दिसल्याने, त्यास हटकले असता, तो इसम पोलीसांना पाहुन पळुन जात असता, त्यास पाठलाग करून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शुभम गणेश सावले वय २५ वर्षे रा. रामजी आंबेडकर नगर, आठवा मैल, वाडी, नागपूर असे सांगीतले. आरोपीचा गुन्हे अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०१ यांचे हद्दपार आदेश क्र. ०३/२०२४ दिनांक १२.११.२०२४ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्दीतुन ०२ वर्षाकरीता हद्दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, फिर्यादी पोहवा विजय वायदुडे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे वाडी येथे पोउपनि. विजय नेमाडे यांनी आरोपीविरूध्द कलम १४२ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे सक्करदरा :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक ०४.०८.२०२६ चे २१.०० वा. ते दिनांक ०५.०८.२०२६ चे १८.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत प्लॉट क्र. ३४, साईश्रध्दा सोसायटी, श्रीनगर—२, बहादुरा येथे राहणारे फिर्यादी रोशन दशरथ धार्मिक वय ४६ वर्ष हे आपले राहते घराला कुलुप लावुन परिवारासह पुतण्याचे घरी वर्धमाननगर येथे मुक्कामी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे राहते घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडी—कोंडा तोडुन, आंत प्रवेश करून, बेडरूममधील आलमारीतील रोख ६२,०००/—रू. तसेच, सोन्या—चांदीचे वेगवेगळे दागिने असा एकुण किंमती ४,५७,४००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. कुणाल दिगावकर यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे अजनी</u>:—** सौ. अनिता सोनु साहनी, वय ३० वर्षे, रा. सावित्रीबाई फुले नगर गल्ली नं. ०४, महात्मा फुले मार्ग, अजनी, नागपूर ह्या दिनांक २९.०६.२०२६ चे ११.३० वा. सोबत मुलगी नामे श्रृष्टी राजेंद्र साहनी, वय अडीच वर्षे व मुलगी नामे दिव्यांशी राजेंद्र साहनी, वय दिड वर्षे यांचेसह पोलीस ठाणे अजनी हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाही. **<u>अनिता वर्णन</u>** —रंग— सावळा, चेहरा— लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ६ इंच, केस— काळे लांब, भाषा— हिंदी/ बोलतात. अंगात— पिवळ्या रंगाचा सलवार सुट घातलेला आहे. **<u>श्रृष्टी वर्णन</u>**— रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— २ फुट ५ इंच, केस— काळे लांब, भाषा— हिंदी बोलते. **<u>दिव्यांशी वर्णन</u>**— रंग— सावळा, चेहरा— गोल, बांधा— सडपातळ, उंची— १ फुट ५ इंच, केस— काळे घुंगराले,



अनिता श्रृष्टी दिव्यांशी

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| **१.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ३, नागपूर | ४२३५/ २०१६ | कलम ३२४,३४ भादंवि | अर्शद अली आझाद अली, वय २४ वर्षे रा. गल्ली नं. ०६, ११२२, मिनीमातानगर नागपूर | २०.०८.२०२६ |
| **२.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ३, नागपूर | ३०५०२९६ /१९९७ | कलम ३२४ भादंवि | मिथून हिराचंद मडावी, वय २२ वर्षे, रा. एनआयटी चाळ कळमना, नागपूर | २४.०८.२०२६ |
| **३.** | मा. प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी,कोर्ट क्र. ०३, नागपूर | ३०३४८५/ २०१२ | कलम २९४,३२३ भादंवि | स्नेहल जगदीशराव विटणकर, रा. रेल्वे क्वॉर्टर, जे /५७, अजनी, नागपूर | २७.०८.२०२६ |
| **४.** | मा. १७वे सहदिवाणी न्यायाधीश क—स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर | ३०४००६५ /२००२ | कलम ३७९ भादंवि | मोहम्मद अजीज मोहम्मद मजीद अली, रा. मोठा ताजबाग, राजीप पहेलवानचे घरासमोर, नागपूर | २४.०८.२०२६ |

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**

**पोलीस उप निरीक्षक,**

**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**

**नागपुर शहर.**